पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

-: प्रेस नोट :- **दि. ०२/११/२०२६**

प्रसिद्ध अभिनेत्यावरील गोळीबार प्रकरणात हरियाणा येथून एका महिला आरोपीस अटक; आतापर्यंत एकूण १३ आरोपी अटकेत.

दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी जुहू परिसरात दुचाकीवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. सदरबाबत जुहू पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १७९०/२०२६, कलम १०९(१), ३(५) भारतीय न्याय संहिता सह कलम ३, २५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हे शाखा गु.र.क्र. १४३/२०२६ अन्वये करण्यात येत आहे. या गुन्ह्यात यापूर्वी गुन्हे शाखेने कोटा (राजस्थान), दिल्ली व सोनीपत (हरियाणा) येथून एकूण १२ आरोपींना अटक केली असून, दि. २७/१०/२०२६ रोजी गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका), १९९९ ची कलमे ३(१)(ii), ३(२) व ३(४) वाढविण्यात आली आहेत.

गुन्ह्याच्या पुढील तपासात सदर संघटित टोळीच्या गुन्हेगारी कृत्यात हरियाणा येथील एका महिलेचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

गुन्हे शाखेच्या पथकाने हरियाणा पोलिसांच्या मदतीने कर्नाल जिल्हा, हरियाणा येथून सदर २२ वर्षीय महिला आरोपीस दि. ०१/११/२०२६ रोजी ताब्यात घेऊन अटक केली आहे. त्यामुळे या गुन्ह्यात आतापर्यंत एकूण १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हे शाखा, मुंबई हे करीत आहेत.

Scanned with CamScanner